


दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेज थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९१ वा | बुधवार, दि. ०४ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

# सोलापूर ZP चा अध्यक्ष 18 मार्चला ठरणार

## तर 11 पंचायत समितीचे कारभारी 12 मार्चला निवडणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची 18 मार्च रोजी निवड केली जाणार आहे. जिल्ह्यातील 11 पंचायत समित्यांचे सभापती आणि उपसभापतींची निवड ही 12 मार्च रोजी केली जाणार आहे.

या निवडीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अकरा अध्यासी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा परिषद आणि ११ पंचायत समित्यांचा निकाल ९ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आला आहे. अकरापैकी सात पंचायत समितींवर भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. तसेच इतरही ठिकाणी आपल्याच पक्षाचा सभापती बसविण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली डावपेच आखले जात आहेत, त्यामुळे सभापती निवडीकडेही राजकीय वतुर्ळाचे लक्ष असणार आहे.

दरम्यान, पंचायत समिती सभापती आणि उपसभातींची निवडी १२ मार्च रोजी होणार असून त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून अकरा जणांवर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. त्यात करमाळ्यासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे, माढ्यासाठी प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, बाशीर्साठी उपजिल्हाधिकारी अमोलसिंह भोसले, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांच्याकडे उत्तर सोलापूरची जबाबदारी असणार आहे.

उपजिल्हाधिकारी सीमा होळकर यांच्याकडे मोहोळची, पंढरपूरसाठी प्रांताधिकारी सचिन इथापे, प्रांताधिकारी विजया पांगारकर यांच्याकडे माळशिरसची, सांगोल्यासाठी प्रांतधिकारी भैरप्पा माळी, उपजिल्हाधिकरी संतोषकुमार देशमुख यांच्याकडे मंगळवेढा, दक्षिण सोलापूरसाठी उपजिल्हाधिकरी अंजली मरोड, प्रांताधिकारी सुमीत शिंदे यांच्याकडे अक्कलकोटची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

ग्रामविकास विभागाकडून २५ फेब्रुवारी दिलेल्या सूचनांच्या आधारे आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील नियम ६७ व ६८ नुसार सभापती व उपसभापतींची निवडणूक प्रक्रिया हे अधिकारी पार पाडणार आहेत. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवड प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी हे पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात.

### हात उंचावून मतदान

पंचायत समित्यांच्या सभापती-उपसभापतींची निवड ही बहुमताने निवड होते. सदस्यांनी हात उंचावून मतदान करायचे आहे. ज्या उमेदवाराच्या बाजूने सर्वाधिक मतदान, तो सदस्य सभापती आणि उपसभापती होईल. जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवडही अशाच पद्धतीने होणार आहे, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जिल्हा परिषदेतील पक्षीय बलाबल

- एकूण जागा 68
- भाजप - 38
- राष्ट्रवादी अजित पवार - 11
- राष्ट्रवादी शरद पवार - 5
- शिवसेना (शिंदे गट) - 8
- शेकाप - 3
- करमाळा स्थानिक आघाडी - 2
- तीर्थक्षेत्र विकास आघाडी - 1

**जिल्ह्यातील 11 पंचायत समित्यांमधील पक्षीय बलाबल**

- भाजप : 07 (अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, माढा, मोहोळ, मंगळवेढा)
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष : 01 (माळशिरस)
- भाजप-राष्ट्रवादी युती : 01 (करमाळा)
- सांगोला तालुका विकास आघाडी : 01 (सांगोला)
- समान संख्याबळ (पंढरपूर) : राष्ट्रवादी काँग्रेस : 08, भाजप : 08

# महाराष्ट्र केसरीसाठी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा ६ व ७ मार्च रोजी

## सोलापूर शहर व जिल्ह्यातील पैलवानांसाठी सुवर्णसंधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे दि. १८ ते २२ मार्च दरम्यान होणाऱ्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद व ६८ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा यासाठी सोलापूर शहर व जिल्ह्यातील खेळाडूंची निवड चाचणी कुस्ती स्पर्धा दि. ६ व ७ मार्च रोजी अथर्व गार्डन, घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

या निवड चाचणी स्पर्धेतून सोलापूर शहर तालीम संघाचे प्रतिनिधित्व करणारे कुस्तीगीर महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व इच्छुक व पात्र कुस्तीगीरांनी या निवड चाचणी स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सोलापूर शहर तालीम संघाचे अध्यक्ष विजयकुमार देशमुख यांनी केले आहे.

स्पर्धेपूर्वी खेळाडूंचे वजन मोजमाप दि. ६ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत करण्यात येणार आहे. स्पर्धा गादी व माती या दोन्ही प्रकारात होणार असून पुढील वजनगट ठेवण्यात आले आहेत —

57, 61, 65, 70, 74, 79, 86, 92, 97 किलो तसेच 86 ते 125 किलो खुला गट (महाराष्ट्र केसरी).

या निवड चाचणी स्पर्धेत सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील सर्व कुस्तीगीरांना सहभाग घेता येणार आहे. स्पधेर्साठी येताना खेळाडूंनी मूळ आधार कार्ड व त्याची झेरॉक्स प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे, असे आयोजकांकडून कळविण्यात आले आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सोलापूर शहर तालीम संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. कुस्ती क्षेत्रातील नवोदित खेळाडूंना राज्यस्तरावर संधी मिळवून देण्यासाठी ही निवड चाचणी स्पर्धा महत्त्वाची ठरणार आहे.

या संदर्भात अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे —

पै. अतिश मोरे (मराठवाडा केसरी) - मोबाईल: 8928892111
पै. अर्जुन साठे (गिर्को महाराष्ट्र केसरी) - मोबाईल: 9146894825

अशी माहिती सोलापूर शहर तालीम संघाचे कार्याध्यक्ष पै. अमर दुधाळ यांनी दिली आहे.

# मार्चच्या सुरवातीलाच सोलापुरात उन्हाचा पारा ३७.२ अंशावर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या उन्हाळ्यातील उच्चांकी ३७.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद आज झाली. सोलापूर शहर व जिल्ह्यात मार्च महिन्याच्या पहिल्याच दिवशी कडाक्याचे उन पडले होते.

मार्च महिन्यात यंदा कडाक्याचे उन असणार, याची चुणूकच आजच्या तापमानाने दाखवून



दिली आहे. शनिवारी सोलापुरात ३६.५ अंश सेल्सिअसची नोंद झाली होती. आज तापमानाचा पारा ३७.२ अंश सेल्सिअसवर पोहोचला होता. एकाच दिवसात ०.७ अंश सेल्सिअसची वाढ झाली आहे.

सोलापूरच्या कमाल व किमान तापमानात वाढ झाल्याने वातावरणात उकाडा वाढला आहे. वाढत्या उन्हाचा परिणाम जनजीवनावर होताना दिसत आहे. दुपारच्या सुमारास अनेक जण घराबाहेर पडणे टाळत आहेत. उन्हापासून बचाव करण्यासाठी पांढरे कपडे, टोपी, गमजाचा वापर सुरू झाला आहे. उन्हाचा चटका वाढू लागल्याने आईसक्रिम, थंडपेये याची दुकाने थाटू लागली आहेत. सोलापूरच्या वातावरणात कमाल व किमान तापमानात चढ उतार होत आहे. त्याचा विपरित परिणाम मानवी आरोग्यावर होताना दिसत आहे. सर्दी, ताप, अंगदुखी, डोकेदुखी, खोकला यासह इतर विकार अनेकांना उदभवू लागले आहेत.

तापमानाचा पारा वाढल्यानंतर अवकाळी पाऊस हजेरी लावत असल्याचा आजपर्यंतचा अनुभव आहे. आता वाढलेल्या तापमानामुळे येत्या काळात अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. सध्या द्राक्ष आणि आंबा ही फळपिके जोमात आहेत. अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरणा परिणाम या फळबागांवर होण्याची शक्यता आहे. या शिवाय रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा, गहू ही पिके काढणीच्या स्थितीत आहेत. अवकाळी पावसाने हजेरी लावल्यास पिकांचे व फळबागांचे मोठे नूकसान होणार आहे.

**मार्चमध्ये पाऊस अन उच्चांकी तापमानाचा विक्रम**

सोलापूर जिल्ह्यात मार्च महिन्याने तुफान पाऊस आणि कडक उन अशी दोन्ही रुपे यापूर्वी दाखविली आहेत. मार्चमध्ये सोलापूरात सरासरी ४० ते ४१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान कमाल तापमान राहते. मार्च महिन्यात सर्वाधिक ४३.९ अंश सेल्सिअसची कमाल तापमानाची नोंद २८ मार्च १८९२ रोजी झालेली आहे. मार्चमधील उच्चांकी तापमानाचा हा विक्रम १३३ वर्षानंतरही आजही कायम आहे. मार्च महिन्यात तापमानाचा पारा भडकल्यानंतर अवकाळी पावसाने हजेरी लावल्याच्याही नोंदी आहेत. मार्च महिन्यात सोलापूर जिल्ह्यात पावसाने हजेरी लावल्याच्या नोंदी सातत्याने आढळतात. मार्चमध्ये एका दिवसात सर्वाधिक ४३ मिली मीटर पावसाची नोंद २७ मार्च १९८९ रोजी झालेली आहे.






## संपादकीय

# 'दररोज तीन'चे दुष्टचक्र

'रोज मरे त्याला कोण रडे' अशी एक म्हण आहे.गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेल्या शेतकर्यांच्या आत्महत्या बघून अगदी तिचाच प्रत्यय येतो. हे जीव देण्याचे सत्र म्हणजे कृषी क्षेत्रावरची भळभळती जखमच. ती बरी व्हावी यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याऐवजी तिला आहे तशी ठेवण्यात धन्यता मानणारी सरकारे असली की काय होते याचे हे उत्तम उदाहरण. सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात सरकारने सरासरी दररोज तीन शेतकरी आत्महत्या करतात अशी कबुली दिली. पण पुढे काय? या आत्महत्या थांबाव्यात असे सरकारला खरोखर वाटते का? या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न सरकारने कधी तरी केला का? या प्रश्नांची उत्तरे नाही अशीच येतात. त्यामुळे या कबुलीच्या पार्श्वभूमीवर सरकारचे अपयश आणखी ठळकपणे अधोरेखित होते. ही जखम इतकी वर्षे का चिघळवत ठेवली गेली याचे उत्तर शोधायला गेले की प्रत्येक टप्प्यावर सरकार कसे अनुत्तीर्ण होत गेले व मलमपट्टीच्या नादात लोकप्रियतेच्या खेळात कसे अडकत गेले याचा इतिहासच उलगडतो. शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न २००१ पासून गाजू लागला. त्याला २६वे वर्ष लागले. या काळात केवळ विदर्भात व त्यातही अमरावती विभागात २४ हजार शेतर्कयांनी आत्महत्या केल्या. ही समस्या नंतर मराठवाड्याला कवेत घेती झाली व हा आकडा बेसुमार वाढला. आता या दोन्ही प्रदेशांत वर्षाला हजार ते दीड हजार शेतकरी मृत्यूला कवटाळतात. कारणे तीच. शेतमालाला भाव नाही, नापिकी, कर्जबाजारीपण. गेल्या २५ वर्षांपासून सरकारच नव्हे तर सार्या राज्याला तोंडपाठ झालेल्या या कारणांच्या मुळाशी सत्ताधार्यांना जाता येऊ नये हे दुर्दैव!

हे मुळाशी जाण्याचे धोरण सरकारने का स्वीकारले नाही याचे उत्तर पुन्हा सवंग राजकीय लाभाचा विचार सतत करणार्या नेत्यांच्या वृत्तीतच मिळेल. मुळात शेती हा घटक एकाच वेळी बाजारपेठ, व्यापारी, बियाणे, खत अशा अनेक घटकांशी जोडला गेलेला. ही गुंतागुंतीची व्यवस्था सुधारायची असेल व शेतर्कयांना उत्पादनावर आधारित भाव मिळवून द्यायचा असेल तर या व्यवस्थेतील अनेकांना नाराज करणे आले. ते कुठल्याही पक्षाच्या सरकारला करायचे नाही. मग अशा वेळी सत्ताधार्यांसमोर एकच पर्याय उरतो तो म्हणजे मनाला तात्पुरत्या भावतील अशा घोषणा करण्याचा. तो मार्ग सरकारने स्वीकारला आणि शेतकरी आणखी अडचणीत येत गेला. शेतर्कयांसाठी कर्जमाफी गेल्या २५ वर्षांत तीनदा लागू केली गेली. सर्वात आधी केंद्रातले डॉ. मनमोहन सिंगांचे सरकार, त्यानंतर उद्धव ठाकरे व देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली कर्जमाफी असा हा प्रवास. यात आता येत्या जूनमध्ये आणखी एका माफीची भर पडेल. असे कर्ज माफ केल्याने शेतर्कयांच्या समस्या सुटेल हा भाबडा आशावाद. कुठलाही शेतकरी माफी हवी असे म्हणत नाही. तो मागतो शेतमालाला रास्त भाव. मात्र, या समस्येवर राजकीय पोळी भाजून घेणार्यांना माफी हवी असते. यात सरकार व विरोधक दोन्ही आले. असा माफीचा खेळ मध्येमध्ये खेळल्याने चांगली वातावरणनिर्मिती होते, निवडणुका जिंकता येतात हे अनेकदा सिद्ध झाल्याने याच खेळात सारे रंगलेले.

हा खेळ कसा वाईट याचे उत्तर या आत्महत्यांच्या आकडेवारीतून मिळते. २०१४ पासून शेतकरी सन्मानाच्या नावावर पुन्हा आर्थिक आमिषे दाखवण्याचा नवा प्रकार सुरू झाला. वर्षाला १२ हजार रुपये घ्या आणि गप्प बसा किंवा मरायचे असेल तर खुशाल मरा असाच यामागचा हेतू. यामुळे शेतकरी आणखी दुष्टचक्रात अडकत गेला. मधल्या काळात 'पॅकेज' नावाची प्रथा सत्ताधार्यांनी सुरू केली. या नावावर मोठमोठे आकडे माध्यमांसमोर फेकायचे व निराशेने ग्रासलेल्या शेतर्कयांचे डोळे दिपतील एवढेच बघायचे. अलीकडे ती प्रथा बंद झाली पण सन्मानाच्या नावावर शेतर्कयाच्या मेहनतीचा अपमान करण्याचा प्रकार अजूनही जोमात सुरू. यातून कृषी क्षेत्रातील विदारक वास्तवाकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण सरकारने स्वीकारल्याचे दिसते. त्याचा परिणाम म्हणजे या वाढत्या आत्महत्या. आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांतील कापूस व सोयाबीन या मुख्य पिकांचे भाव २५ वर्षांत किती वाढले वा कमी झाले या प्रश्नाशी कुणालाच देणेघेणे नाही. सोयाबीनचा भाव दहा वर्षांपूर्वी चार हजार रुपये होता. आजही तो तेवढाच आहे. कापसाचा भाव २०२३चा अपवाद वगळता पाच ते सहा हजार रु.च्या दरम्यान खेळत राहिला. याच काळात उत्पादन खर्च तिपटीने वाढला. बियाणे, खते, मजुरी हे घटक यासाठी कारणीभूत ठरले. हा खर्चाचा विचार सरकारी पातळीवर कुणीच करताना दिसत नाही. याच काळात सरकारने जाहीर केलेला हमीभावसुद्धा बाजारपेठेतील आकड्यांच्या भोवती फिरत राहिला. उत्पादन खर्च जास्त व सरकार तसेच बाजारातला भाव कमी अशा अवस्थेला वारंवार सामोरे जाणारा शेतकरी आत्महत्या नाही तर आणखी काय करणार?

अलीकडे सरकारने नवीन टूम काढली. खरेदी केंद्रे स्थापन करून हमीभावाने मुख्य पिके खरेदी करण्याची. यातून शेतर्कयांना दिलासा मिळत असल्याचे चित्र निर्माण केले जात असले तरी वास्तव वेगळेच. ही खरेदी केंद्राची नवी व्यवस्था सध्या पूर्णपणे व्यापार्यांच्या ताब्यात गेलेली दिसते. बाजारात पीक येण्याच्या काळात ही केंद्रे सुरू करायची नाहीत. व्यापाऱ्यांनी भरपूर खरेदी केल्यावर केंद्राचा शुभारंभ करायचा. मग व्यापार्यांनी त्यांच्याकडचा माल शेतर्कयांचे सातबारा गोळा करून याच केंद्रांवर विकून मधल्यामध्ये बक्कळ नफा कमवायचा असा प्रकार सुरू झाला. तो सरकारच्या लक्षात येईल असे अनेक गैरव्यवहार उघडकीस आले. पण फुटकळ अपवाद वगळता कारवाई शून्य. सरकारने या २५ वर्षांत शेतर्कयांच्या मूळ जखमेवर उपचार न करता ज्या व्यवस्था उभ्या केल्या त्यातून शेतर्कयांचा फायदा तर झालाच नाही, उलट ते नागवले गेले. अशा स्थितीत आत्महत्या वाढणार नाहीत तर आणखी काय होणार?

शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावे, त्याला जोडधंदा करता यावा, त्याने लागवड क्षेत्रात बदल करून नवनव्या पिकांना प्राधान्य द्यावे यासाठी सरकारने शेकडो योजना जाहीर केल्या. त्यातल्या अनेक अमलात आणल्या पण त्याचा परिणाम काय तर शून्य. असे का घडले याचे उत्तर अमंलबजावणीच्या अपयशात व सरकारी बाबूंच्या खाबूगिरीत दडले आहे. आत्महत्याग्रस्त भागात सिंचन क्षेत्रात किती वाढ झाली या प्रश्नाचे उत्तर गेल्या १३ वर्षांपासून सरकारने दिलेलेच नाही. एकीकडे वास्तव दडवून ठेवण्याचा प्रयत्न करायचा व दुसरीकडे नव्या सिंचन योजनेच्या घोषणांचा सपाटा सुरू ठेवायचा हेच सरकारचे धोरण राहिले. यामुळे आधीच निराशेच्या गर्तेत ढकलला गेलेला शेतकरी विषाचा प्याला जवळ करू लागला. ताजे आकडे तेच दर्शवतात. मुळात हा वर्ग संघटित नाही. जातीपातींत विभागला गेलेला आहे. अलीकडे तर राजकीय यशापयशाचा विचार न करता या वर्गासाठी लढणारे नेतृत्वही राहिले नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा राजकीयदृष्ट्या संवेदनशील होऊ शकला नाही. त्याचा फायदा राजकीय पक्ष घेत आले तर दुसरीकडे शेतकरी गळफासाला जवळ करू लागले. हे दुष्टचक्र कधीच संपणार नाही अशी स्थिती आता निर्माण झालेली आहे.

# राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ याचे स्वागतच; मग विदर्भातील युवावर्ग रोजगार व शिक्षणासाठी पुण्या-मुंबईत किंवा देशाच्या इतर भागात का जातात?

राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल आहे याचा अभिमान आम्हा सर्वांनाच आहे आणि असायलाच हवा.याचे जितके कौतुक कराल तितके कमी आहे,त्यामुळे याचे स्वागतच. राज्य सरकारने सन २०२९ पर्यंत एक लाख कोटी डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सरकारने निर्धारित केले असून,राज्याची अर्थव्यवस्था आताच ५१ लाख कोटींवर पोहोचली आहे.अशी माहिती माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ ला विधानसभेत दिली.याचे मनापासून स्वागत. कारण राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होणे म्हणजे देशाच्या विकासाला हातभार लावणे होय.परंतु देशाचा केंद्र बिंदू आणि राज्याची उपराजधानी नागपूर आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.याच अनुषंगाने माज्यामते राज्यातील व विदर्भातील युवावर्गानी रोजगारासाठी नागपूरमध्ये धाव घ्यायला पाहिजे होती, परंतु आज नागपूरसह विदर्भातील युवावर्ग रोजगारासाठी पुण्या-मुंबईत किंवा इतर राज्यात का धाव घेत आहे याचा गांभीयार्ने सरकारने विचार करण्याची गरज आहे.आज नागपूरचा सुध्दा विकास झपाट्याने होत यात दुमत नाही. परंतु आयटी सेक्टर किंवा इतर फिल्डमधील युवकांना आपले घरदार सोडून दुसऱ्या शहरात धाव घ्यावी लागते ही नागपूर सारख्या उपराजधानीची शोकांतिकाच म्हणावी लागेल.उदाहरण द्यायचे झाले तर,आज इंजिनिअरिंग केलेल्या विद्यार्थ्यांना पुण्या-मुंबईत ५० हजारांच्यावरती पगार मिळतो आणि उपराजधानी सारख्या नागपूर शहरात १५ ते २० हजार रुपये पगार मिळतो अशी तफावत का? राज्य एकच आहे,शिक्षण एकच आहे, पदवी एकच आहे परंतु युवा वर्गाच्या भविष्यासोबत खिलवाड का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.आज नागपूरातीलच नाही तर संपूर्ण विदर्भातील मोठ्या प्रमाणात युवावर्ग नौकरीच्या शोधासाठी पुण्या-मुंबईकडे धाव घेत आहे ही कल्पना सरकारला का नाही? यावरून स्पष्ट होते की,आज जो युवावर्ग इंजिनिअर झालेला आहे त्याच्या पसंतीचा जॉब किंवा नौकरी त्याला नागपूरात मिळत नसावी किंवा त्याच्या शिक्षणानुसार त्याला पगार मिळत नसावा म्हणूनच नागपूरसह विदर्भातील युवावर्ग राज्यातील पुणा-मुंबई किंवा इतर भागांची पसंत करत असावेत.आपली संस्कृती सांगते की, मुलांनी आई-वडीलांचा सांभाळ केला पाहिजे. अहो ज्याठिकाणी आई-वडील रहातात त्या ठिकाणी जर मुलांना योग्य आणि त्यांच्या शिक्षणानुसार नौकरीच (जॉब) मिळत नसेल तर त्याला नाईलाजास्तव जॉबसाठी आई-वडिलापासुन दुर जावे लागते आणि याला जबाबदार सरकार असल्याचे मी समजतो. अहो विदर्भातील मुलांना त्यांच्या मनालायक नौकरी मिळत नाही किंवा पगार नाही,मग सहाजीकच आहे त्यांना आई वडील आणि घरदार सोडून बाहेर जावेच लागेल.पहिलेच राज्यांमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि आता त्यात भर घालण्याचे काम एआय करीत आहे यामुळे काही काळात आयटी सेक्टर सुद्धा धाराशाही होण्याची होण्याच्या मार्गावर असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.असेही सांगण्यात येते की, पुढील काही वर्षांत महाराष्ट्र जगातील १३ वी अर्थव्यवस्था होईल असे भाकीत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्तविले आहे ही अत्यंत आनंदाची व गौरवास्पद बाब आहे.परंतु संपूर्ण महाराष्ट्र रोजगारीच्या बाबतीत सक्षम झाला आहे का, सर्वांना मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत का? याचा विचार सरकारने करने गरजेचे आहे.आज आपण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुदृढ आहे असे आपण सांगतो.परंतु राज्यातील विदर्भासह अनेक क्षेत्रातील युवा वर्ग शिक्षणासाठी व नौकरीसाठी आपले मुळ क्षेत्र सोडून राज्याच्या इतर भागात किंवा देशाच्या इतर भागात जातो याचे मुख्य कारण काय याचाही अभ्यास राज्याच्या अर्थतज्ज्ञांनी करण्याची गरज आहे.असे सांगितले जाते की परदेशातील थेट परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे,मग असे असुनही राज्यातील काही भागांतील युवावर्गांना समाधानकारक जॉब व पगार का मिळत नाही? देशातील एकूण गुंतवणूकीपेक्षा ३९ टक्के परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात असल्याचे सांगितले जाते,मग राज्यातील संपूर्ण भागात भरघोस रोजगार निर्मिती का नाही? असे अनेक प्रश्न आजही राज्याच्या जनतेपुढे उपस्थित होतात.त्यामुळे सरकारने अर्थव्यवस्थेप्रमाणे रोजगार निर्मिती व वाढत्या महागाईनुसार रोजगारांना पगार दिले पाहिजे.सरकारने फक्त आश्वासने किंवा घोषणाबाजी करून चालणार नाही तर या संपूर्ण गोष्टी कृतीत बदलविल्या पाहिजे. त्याचप्रमाणे राज्याचा विकास भरभराटीला न्यायचा असेल तर सर्वप्रथम वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.कारण महागाई सर्वच गोष्टींमध्ये अडचण निर्माण करीत असते.राज्यातील १० टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईनुसार डीए मिळत असतो याचे स्वागतच,परंतु त्याचा परिणाम ८० टक्के शेतकरी, शेतमजूर, गरीब, सर्वसामान्यांना भोगावा लागतो.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम महागाईवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.आपण आपल्या अर्थव्यवस्थेनुसार राज्याचा विचार केला तर आपण सर्वच बाबतीत सक्षम असायला पाहिजे होते.परंतु आजही राज्याच्या अती दुर्गम भागात मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत.यामुळेच आपल्याला अती दुर्गम भागात आजही कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे आजही राज्यात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत यावर सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमदान शिबीर संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन मौजे रानमसले ता उत्तर सोलापूर येथे दिनांक 16 फेब्रुवारी ते 22 फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रानमसले येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रवीण कुलकर्णी, आत्माराम गरड दशरथ गरड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अपूर्वा पिस्के तसेच सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आत्माराम गरड यांचा सत्कार स्वयंसेवक मुझमील शेख यांच्या हस्ते, दैनिक दिव्यामराठीचे पत्रकार प्रवीण कुलकर्णी यांचा सत्कार स्वयंसेवक अगम जैन यांच्या हस्ते व दशरथ गरड यांचा सत्कार



स्वयंसेवक श्रीकांत ढेरे यांच्या हस्ते शाल व रोप देऊन करण्यात आला. प्रवीण कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सर्व स्वयंसेवकांनी अतिशय उत्साहाने या शिबिरातील विविध उपक्रम राबविले तसेच (change is rule of life) परिवर्तन जीवनाचा नियम आहे या वाक्याद्वारे त्यांनी स्वयंसेवकांना जीवनाची एक अमोल व अनमोल गोष्ट समजून सांगितली. या रासेयो शिबीराअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील व्यक्तीमत्व विकासाला चालना मिळते. त्यांनी सर्व स्वयंसेवकांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शिबीरामुळे विद्यार्थ्यांची ग्रामीण जीवनशैलीशी नाळ जोडली जाते व एक उत्तम नागरिक घडण्यास मदत होते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होते. तसेच या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम तसेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्राध्यापक अशीच सरकाळे सर राबवलेल्या सर्व उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली तसेच या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा झालेला विकास व त्यांची याबद्दल देखील त्यांचे मनोगत व्यक्त केले तसेच राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत राबविण्यात येणार्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा व देशसेवाभाव रुजण्यासाठी मदत होते. विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची भावना रुजून त्यांनी इतरांना मदत करावी व आपल्या देश पुढे नेण्यासाठी हातभार लावावा. यानंतर स्वयंसेवक अपूर्वा इरवाडकर, मुजामिल शेख, अगम जैनआदींनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वयंसेवक सावरी बिराजदार व भक्ती बिडवे यांनी केले. आभारप्रदर्शन स्वयंसेवक अमोघ वर्ष यानी व्यक्त केले. त्यानंतर सर्व रासेयो स्वयंसेवकांनी उपस्थित अतिथिंकडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी सप्रेम भेटवस्तू दिली.

या सात दिवसाच्या शिबीराअंतर्गत रानमसले येथे ग्रामस्वच्छत, वृक्षारोपण, शोषखड्डे निर्मिती, महिलांसाठी मनोरंजनपर स्पर्धा, विविध शालेय स्पर्धा उपक्रम, रक्तदान शिबीर, ह.भ.प. अभिनंदन महाराज यांचे समाजप्रबोधपर प्रवचन, जनजागृती प्रभातफेरी, कृषी क्षेत्रातील तज्ञांची विविध विषयांवरील मार्गदर्शनपर व्याख्याने आदींचा समावेश होता. हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षिरसागर, उपसरपंच रमेश सुतार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकवृंद, रानमसले गावातील सर्व ग्रामस्थ तसेच रासेयो स्वयंसेवक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# तडवळे येथे नामजप सोहळा संपन्न



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील जगदगुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपीठ नानिजधाम यांच्या कृपा आशिवार्दाने तडवळे सेवाकेंद्राच्या माध्यमातून नामजप सोहळा आयोजित करण्यात आला होता दर सालाप्रमाणे याही वर्षी तडवळे सेवाकेंद्रात नामजप सोहळा आयोजनामध्ये मृदुंगचार्य जालिंदर बाप्पा सस्ते वारकरी संस्था येडशी येथील विद्यार्थ्यांना रोजनिशी मध्ये लागणारे स्वयंपाक साहित्य (भांडी) देऊन कौतुकास्पद उपक्रम राबवला या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले स्वामीभक्त संग्राम देशमुख, गावचे उपसरपंच हरून शेख, राजाभाऊ लोंढे,विशाल जमाले, पं.स सदस्य जगन्नाथ विभुते, ग्रा.प. सदस्य सुभाष धनके, धनाजी होगले गावचे शंकर पवार, सुनील ढिकरे, महादेव सस्ते तसेच, जिल्हाअध्यक्ष संतोष केसकर, सचिव बा.कानडे, दिनेश देटे, बालाजी थोरात उपस्थित होते. कार्यक्रमास प्रभाकर गुळवे, रामलिंग सुरवसे ,अशोक देशमुख, गणेश गायकवाड, जयसिंग भोईटे, अनिकेत पवार,राज नाडे, आबा कटवते, नवनाथ कदम, धनाजी सावंत, प्रदीप शिंदे, बाळू कोरडे, भगवान कोळी, नितीन पोळ, गोपाल कांबळे, समाधान पवार, स्वप्नील भांड, राज सुरवसे, भैया सुरवसे, शुभम भांड, रमेश मिसळ भाऊ सौदागर, व तडवळे सेवा समिती यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद सोकांडे यांनी केले. कार्यक्रमास गावातील तसेच परिसरातील भक्तगण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# महिला उमेदवारांसाठी 06 मार्च रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार महिला उमेदवारांसाठी मंगळवार, दिनांक 06 मार्च 2026 रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय महिला रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून सोलापूर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक महिला उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी, आय.टी.आय. डिप्लोमा, ग्रॅज्युएट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीय, नर्सिंग, बी.कॉम, अशा प्रकारची एकुण 500 पेक्षा जास्त रिक्तपदे 10 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.

नोकरी इच्छुक महिला उमेदवारांनी आपल्या कागदपत्रासह शुक्रवार, दिनांक 06 मार्च 2026 रोजी ठीक सकाळी 10 ते दुपारी 01 या वेळेत "ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय रविवार पेठ, राजेंद्र चौक, सोलापूर" येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत 0217-2992956 या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापुर येथे संपर्क साधावा, असे आवाहन श्रीमती संगीता खंदारे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांनी केले आहे. अधिक माहितीस्तव https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट दयावी. अशी माहिती सहायक आयुक्त ,कौ.वि.रोजगार व उद्योजकता यांनी दिली आहे.

# वटवृक्ष देवस्थानातून धर्म-अध्यात्म-समाजसेवेचा संगम

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):** येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक उपक्रमांचे सोलापूर जिल्हा न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी सुनील गावडे यांनी कौतुक केले. देवस्थानच्या कायार्तून ह्यधर्म, अध्यात्म व समाजसेवेचाह्व त्रिवेणी संगम अनुभवायला मिळाल्याचे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली देवस्थानच्या वतीने असंख्य गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा तसेच निवासाची व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. समाजकार्यात सातत्याने कार्यरत राहून स्वामींवर गाढ श्रद्धा ठेवून अध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीची भेट झाल्याचा आनंद असल्याचे गावडे यांनी सांगितले. इंगळे यांची कल्पकता, दूरदृष्टी आणि भविष्यातील विविध योजनांविषयी ऐकून आपण भावूक झालो, असेही त्यांनी नमूद केले.

स्वामी दर्शनानंतर देवस्थान कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते न्यायदंडाधिकारी सुनील गावडे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद व प्रतिमा देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी प्रथमेश इंगळे, समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा. शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, श्रीकांत मलवे आदी उपस्थित होते.

# ९ महसूल मंडळामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यामधील एकूण ९ महसूल मंडळामध्ये श्री. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबवण्यिात येणार आहे. या अभयिानात विविध प्रकारचे महसूली दाखले, पुरवठा कार्यालयाशी संबंधित दाखले, इतर विभागांशी संबंधित योजना व दाखले यांची सुविधा तात्काळ पुरवली जाणार आहे. तालुक्यातील महसूल मंडळातील नागरिकांनी उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन नलिश पाटील, तहसलिदार उत्तर सोलापूर यांनी प्रसध्दिी पत्रकान्व्ये केले आहे.

या अभियानाचे नयिोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे. - मंडळाचे नांव व दनिांक पुढीलप्रमाणे - ग्रामीण भागातील मंडळात - तिऱ्हे व कोंडी - शनविार, दि. 7 मार्च 2026, वडाळा व मार्डी - शनविार, दि. 14 मार्च 2026, बाळे व शेळगी - शुक्रवार, दि. 10 एप्रलि 2026, सोरेगाव - शुक्रवार, दि. 17 एप्रिल 2026.

महानगरपालकिा ठिकाणी असलेली मंडळ - सोलापूर- शुक्रवार, दि. 8 मे 2026, मजरेवाडी- शुक्रवार, दि. 15 मे 2026

## वात्रटिका

### युद्धाच्या झळा

घरात नि दारातच असेल
भेदी तर कशाला हवा पुरावा...
दुश्मनालाही सहज लागतो मग
आपल्या गुपीताचा सुगावा...
जगात कुठे आणि काहीही
घडेल याचा आता नाही नेम...
सामान्यांचे काय घेऊन बसावे
राष्ट्रप्रमुखाचा घुसून होतो गेम...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नेताजी प्रशालेच्या शितलकुमार पाटील यांना आदर्श विज्ञान शिक्षक पुरस्कार प्रदान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेचे सहशिक्षक शितलकुमार पाटील यांना सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाच्या आदर्श विज्ञान शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

करमाळा येथील राजयोग सभागृहात आयोजित कार्यक्रमात माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, जिल्हा परिषद सदस्या रश्मी बागल, विज्ञान मंडळाचे जिल्हाध्यक्ष संजय जवंजाळ, राज्य संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते, सचिव डॉ.नूर अहमद कारंजे यांच्या हस्ते शितलकुमार पाटील यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाटील हे नेताजी शिक्षण संस्थेत गेल्या वीस वर्षापासून विज्ञान विषयाचे अध्यापन करीत असून पाच वेळा तालुका, सात वेळा जिल्हा, तीन वेळा राज्य , एक वेळा राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात यश प्राप्त केले आहेत.राष्ट्रीय विज्ञान बालनाट्य स्पर्धेत सहभाग घेऊन तृतीय क्रमांक पटकाविले आहे.विज्ञान विषय अध्यापनात दाखविलेली निष्ठा, प्रयोगशीलता वृत्तीमुळे, विद्यार्थ्यांच्या जीवनात वैज्ञानिक दृष्टीकोन, जिज्ञासा आणि संशोधन वृत्ती निर्माण केल्यामुळे , विज्ञान विषयीची आवड निर्माण करण्यासाठी केलेले सातत्यपूर्ण उल्लेखनीय प्रयत्नांमुळे, विज्ञान प्रदर्शन, प्रकल्प स्पर्धा, नवोपक्रम उपक्रम तसेच समाजाभिमुख वैज्ञानिक जनजागृती कार्यक्रमांमध्ये दिलेले योगदान विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरल्याने ,त्यांच्या कार्यामुळे आपल्या विद्यालयाचे तसेच जिल्ह्याचे नाव उज्वल केल्याबद्दल पाटील यांना आदर्श विज्ञान शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे जिल्हा अध्यक्ष संजय जवंजाळ यांनी सांगितले. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी अभिनंदन केले.

# बार्शीतील उद्यानांचा होणार कायापालट
## महिलांसाठी स्वतंत्र जिम उभारणार- तेजस्विनी कथले



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** शहरातील सर्व सार्वजनिक उद्याने सुस्थितीत करून त्यांचा सर्वांगीण विकास केला जाणार असून महिलांसाठी स्वतंत्र जिमची सुविधा उभारण्यात येणार आहे, अशी माहिती बार्शीच्या नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांनी दिली.

सध्या शहरातील काही उद्यानांमध्ये स्वच्छतेचा अभाव, तुटलेली बाके, निष्क्रिय खेळ साहित्य तसेच प्रकाशयोजनेची कमतरता दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून सर्व उद्यानांची पाहणी करून टप्प्याटप्प्याने दुरुस्ती व सुशोभीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे.

महिलांच्या आरोग्याचा विचार करून निवडक उद्यानांमध्ये अत्याधुनिक ओपन जिम उपकरणे बसवली जाणार आहेत. त्यामुळे महिलांना सकाळ-संध्याकाळ सुरक्षित वातावरणात व्यायामाची सुविधा उपलब्ध होणार आहे.दरम्यान, शहरातील सार्वजनिक बागांची सध्या अतिशय दयनीय अवस्था झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर लवकरच शहरातील बागांचे पुनर्जीवन करण्यात येईल, असे आश्वासन माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी दिले आहे.

शहरातील विविध भागांतील बागांमध्ये तुटलेली खेळणी, मोडकी बाके, वाढलेले गवत तसेच स्वच्छतेचा अभाव दिसून येत असल्याने लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच बागांचा योग्य उपयोग करता येत नाही.

या स्थितीची दखल घेत राजेंद्र राऊत यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून बागांची स्वच्छता, दुरुस्ती आणि सुशोभीकरण करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच शहरातील बागा पुन्हा आकर्षक व नागरिकांसाठी उपयुक्त बनवण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बागांचे पुनरुज्जीवन झाल्यास नागरिकांना सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी तसेच मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित व सुंदर जागा उपलब्ध होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जाहीर प्रसिध्दीकरण
क्र.अभि/कावि नं. ६८/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. सोमनाथ भैरु वसेकर वय - ४१ वर्षे, धंदा- शेती, रा. पाटकुल, ता. मोहोळ,जि. सोलापूर } अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत पाटकुल, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता. ०१/०६/१९८४ रोजी मौजे पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता. ०१/०६/१९८४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८४ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच सोमनाथ भैरु वसेकर यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१३ /३ / २०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ३/३/२०२६

**लिपीक** (शिक्का)

### जाहीर प्रसिध्दीकरण
अर्ज क्र. ९९/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

शरद वसंत कुलकर्णी } अर्जदार

विरुध्द

ग्रामसेवक चिंचोलीकाटी } सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदाराचे वडील - वसंत यशंवत कुलकर्णी हे दि. २८/०२/१९७५ रोजी रोजी मरण पावले आहेत. त्यांच्या मृत्यूची नोंद चिंचोलीकाटी येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मृत्यू तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणीव अर्जदारांना नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश ग्रामसेवक चिंचोलीकाटी यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे वसंत यशंवत कुलकर्णी यांचा दि. २८/०२/१९७५ रोजी झाल्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद चिंचोलीकाटी ग्रामपंचयातीच्या रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून ग्रामसवेक चिंचोलीकाटी यांना वसंत यशंवत कुलकर्णी हे दि. २८/०२/१९७५ रोजी मरण पावल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दि.०३/०३/२०२६

(शिक्का)

# राज प्रोएक्टिव्ह अबॅकसचे १० पैकी १० विद्यार्थी यशस्वी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत राज प्रोएक्टिव्ह अबॅकस, सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन करत शहराचा गौरव वाढवला आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व १० विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शंभर टक्के निकाल नोंदवला.

**स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे -**

१)दिप्ती लक्ष्मीकांत बत्तुल (इयत्ता ६ वी) - क्रमांक ८,२)प्रगती विरेश कलशेट्टी (इ. ६ वी) - क्रमांक १६,३)रोनक राजेश बिंगी (इ. ६ वी) - क्रमांक १,४)ऋतिका रवि चिप्पा (इ. ३ री) - क्रमांक १३,५) श्रवंती माणिक फलमारी (इ. ५ वी) - क्रमांक १७,६)श्रेयस धिरज चौधरी (इ. ४ थी) - क्रमांक १८,७)श्रियांश श्रीकांत कटकम (ज्युनिअर केजी) - क्रमांक १८,८)स्वराज संदीप पतंगे (इ. २ री) - क्रमांक १८,९)जोहेब शकील मुलाणी (इ. ३ री) - क्रमांक १६, १०)समिक्षा अमोल शिंदे (इ. ८ वी) - क्रमांक १६.

विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवर मानांकित रँक व बेस्ट परफॉर्मन्स सन्मान मिळवत केंद्राचा लौकिक उंचावला आहे. सातत्यपूर्ण सराव, योग्य प्रशिक्षण आणि पालकांचा ठाम पाठिंबा यामुळे हे यश शक्य झाले, असे केंद्राचे संचालक राजेंद्र करली यांनी सांगितले.

यावेळी केंद्राच्या समन्वयक वीणा करली यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, 'विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून योग्य दिशेने सातत्यपूर्ण मार्गदर्शन केल्यास ते राष्ट्रीय स्तरावरही उज्वल यश मिळवू शकतात. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही नक्कीच प्रेरणा मिळेल.'

या भव्य यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे, पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

'राष्ट्रीय स्तरावर सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी केलेली ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आमचे प्रयत्न सतत सुरू राहतील.'

**– राजेंद्र करली**

### जाहीर प्रसिध्दीकरण
अि.ज.नं / २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

महमदरफिक मुनीर शेख वय - ५० वर्षे. धंदा- मजुरी रा. मोहोळ ता. मोहोळ } अर्जदार

विरुध्द

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा महमदरफिक मुनीर शेख यांचा जन्म दि.१/९/१९७६ रोजी मोहोळ ता. मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचा महमदरफिक मुनीर शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेबर १९७६ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१७/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता. २/३/२०२६

**हुकूमावरुन**
**तहसीलदार मोहोळ सोलापूर**

### जाहीर प्रसिध्दीकरण
अि.ज.नं / २०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

रंजना प्रशांत भोसले वय - ४५ वर्षे. धंदा - गृहिणी रा. मोहोळ ता. मोहोळ } अर्जदार

विरुध्द

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी प्रणिती प्रशांत भोसले जन्म दि.१४/३/२०१० रोजी मौजे मोहोळ ता. मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. परंतु तिच्या जन्म दाखल्यावर तिचे नाव प्रणिती ऐवजी ऋतुजा असे झाले आहे परंतु तिच्या शाळेचा दाखला, आधारकार्ड, रेशनकार्ड आणि सर्व कागदपत्रावर प्रणिती असे नाव झाले असून ऋतुजा हे नाव जन्म दाखल्यावरून दुरुस्त होऊन प्रणिती असे नोंदकरून तसा मला जन्म दाखला मिळावा म्हणून अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माचीनोंद नावात दुरुस्त करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१७/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २/३/२०२६

**हुकूमावरुन**
**तहसीलदार मोहोळ सोलापूर**

# अक्कलकोटमध्ये मावा-गुटखा विक्रेत्यांवर धडक कारवाई



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** मावा व गुटखा विक्रीवर बंदीचे आवाहन करूनही नियम धाब्यावर बसवणाऱ्या विक्रेत्यांवर अक्कलकोट नगर परिषदेने धडक कारवाई करत दंड आकारला. शहरातील विविध दुकानांवर छापे टाकून ही कारवाई करण्यात आली.नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे, आरोग्य अधिकारी नितीन शेंडगे तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. दोन दिवसांपूर्वी नगरपरिषदेच्या वतीने मावा बंदीबाबत स्पष्ट इशारा देण्यात आला होता; मात्र काही विक्रेते सर्रास विक्री करत असल्याचे आढळून आले.

कारवाईनंतर संबंधितांवर दंडात्मक उपाययोजना करण्यात आल्या. पुढेही नियमांचे उल्लंघन झाल्यास अधिक कठोर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा नगरपरिषद आणि पोलिस प्रशासनाने दिला आहे.दरम्यान, शहरात आरोग्यविषयक नियमांची अंमलबजावणी कडक करण्याची गरज व्यक्त करत नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले.


## वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779


# ग्रामपंचायत ढवळस ता.माढा जि.सोलापूर

## टेंडर नोटीस

ग्रामपंचायत ढवळस,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | जि.प.शाळा गावठाण शौचालय,मुतारी दुरुस्ती करणे. | १,६५,०००/ | १६५०/- | २०० | १ महिना | खुला |
| २) | नवीन पाईप लाईन करणे किंवा साहित्य खरेदी. | १,५०,०००/ | १५००/- | २०० | १ महिना | खुला |

टीप: १)कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.०४/०३/२०२६ स.१०.०० पासून २)भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.११/०३/२०२६ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय ढवळस ३)निविदा उघडणेचा दि.१२/०३/२०२६ रोजी स. ११.०० वाजता ४)निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५)निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
ढवळस,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- प्रशासक
ग्रामपंचायत ढवळस,
ता.माढा,जि.सोलापूर


## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# रंगपंचमीनिमित्त मद्य दुकाने बंद ठेवण्याचे आदेश

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हयात साजऱ्या होणाऱ्या रंगपंचमी उत्सव सन 2026 निमित्त सार्वजनिक शांतता राखणे आवश्यक असल्याचे मत झाल्याने, महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम मधील कलम १४२ (१) अन्वये रविवार, दि. 08 मार्च 2026 रोजी जिल्हयातील सर्व देशी, विदेशी मद्य विक्री दुकाने, व ताडी दुकाने पूर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेश जल्हिाधकिारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे पत्रकात नमूद आहे.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **BAGESHRI BALKRASHNA NAIK** To **BHAGYASHRI DNYANESHWAR JOSHI** for passport issuance.

## CHANGE IN NAME

I am changing my name From **SAYYAD ASAMA MAZHARALI** To **ASMA RAEES SHAIKH**


## CHANGE IN NAME

I am changing my name From **SHAIKH RAEES LAL AHMED** To **RAEES LAL AHAMAD SHAIKH**

## CHANGE IN NAME

I am changing my name From **LALASAHEB MANIK SHAIKH** To **LAL AHAMAD MANIK SHAIKH**


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री- विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु - 191

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | | 8 | | 2 |
| 7 | | | 4 | 2 | 8 | | 9 | 6 |
| 2 | 1 | | | 3 | | 7 | | 5 |
| | 3 | 1 | | | | 9 | 8 | |
| | | | 1 | | | | | 7 |
| 8 | 2 | | 9 | 5 | | | | 3 |
| 3 | | | | | 2 | | 6 | |
| | 8 | 5 | | 7 | 6 | | | |
| 9 | | 2 | 5 | | 1 | 3 | | 8 |

# भारत-अमेरिका व्यापार कराराची सोलापूरात प्रतीकात्मक होळी

## शेतकरी, व्यापारी व ग्रामीण अर्थव्यवस्थेस घातक असल्याचा आरोप

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत-अमेरिका व्यापार कराराच्या निषेधार्थ सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी शहरात प्रतीकात्मक होळी आंदोलन करण्यात आले. प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडले. यावेळी कार्यकर्त्यांनी कराराच्या प्रतीची होळी करून केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. ह्लनरेंद्र झाले सरेंडरह्व, ह्लपी.एम. इज कॉम्प्रोमाइज्डह्व अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी करार मागे घेण्याची मागणी केली.



चेतन नरोटे यांनी पत्रकारांशी बोलताना आरोप केला की, अमेरिकेच्या दबावाखाली केंद्र सरकारने देशहिताशी तडजोड करणारा करार केला आहे. अमेरिकेतील कथित एपस्टाईन प्रकरणानंतर स्वतःची प्रतिमा वाचविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच या करारामुळे शेतकरी, व्यापारी, वस्त्रोद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल, असे ते म्हणाले.

करारातील टॅरिफ रचनेवर प्रश्न उपस्थित करताना त्यांनी सांगितले की, अमेरिकेकडून भारतात निर्यात होणाऱ्या मालावर शून्य किंवा अत्यल्प शुल्क ठेवण्यात आले आहे, तर भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या मालावर १८ टक्के शुल्क आकारले जात आहे. पूर्वी हे शुल्क केवळ ३ टक्के होते, असा दावा त्यांनी केला. रशियन क्रूड तेल आयातीच्या कारणावरून अतिरिक्त दंडात्मक शुल्क लादण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला.

करारानंतर काही कृषीपिकांच्या दरात घसरण झाल्याचे सांगत सोयाबीन, मका, कापूस आणि तूर उत्पादकांना मोठे नुकसान होत असल्याचा दावा नरोटे यांनी केला. मोठ्या प्रमाणावर आयात वाढल्यास देशांतर्गत उद्योग आणि रोजगारावर परिणाम होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी नगरसेवक नरसिंह आसादे, प्रदेश सचिव श्रीशैल रणदिरे, महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, युवराज जाधव, तिरुपती परकीपंडला, विवेक कन्ना, सुभाष वाघमारे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदिला नदीचे अस्तित्व टिकलेच पाहिजे - महापौर विनायक कोंड्याल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील आदिला नदीचे अस्तित्व टिकलेच पाहिजे. मी या नदीला नाला म्हणालोच नाही. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला.सोलापूर मधील आदिला नदीचे अस्तित्व कायमस्वरूपी टिकलेच पाहिजे. शहरातून नदी जात असेल तर आम्हाला अभिमानच आहे. याप्रकरणी कोणालाही पाठीशी घालण्याचा आपला प्रयत्न नाही, या ठिकाणी किमान नाल्यासारखी खोदाई केली असती तर पाण्याचा निचरा झाला असता असे मी म्हटले होते, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.



सोलापूर श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजित वातार्लाप कार्यक्रमात ते बोलत होते. एवढे त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल यांनी गेल्या 25 दिवसातील कामकाज आणि कायार्चा आढावा सांगितला. ते पुढे म्हणाले की, आदीला नदीसंदर्भात घेतलेल्या बैठकीवेळी पाटबंधारे विभागाकडे माहिती उपलब्ध नव्हती. या नदीच्या सीमांकनाचे काम करावे अशी मागणी आपण केली असून ते दोन महिन्यात करण्यात येईल असे पाटबंधारे विभागाने सांगितले आहे. या नदीच्या परिसरात प्लॉटिंग, बांधकामे आदीसंदर्भात बेकायदेशीर कामे झाली असतील, तर त्यावर कारवाई झाली पाहिजे, अशी आपली भूमिका आहे. या परिसरात विकासकामांमध्ये ज्यांच्या जमिनी जात असतील, तर अशांना शासनाकडून मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. याप्रकरणी कोणालाही पाठीशी घालण्याचा आपला प्रयत्न नाही, असेही महापौरांनी स्पष्ट केले. या ठिकाणी किमान नाल्यासारखे खोदाई केली असती तर पाण्याचा निचरा झाला असता, असे मी म्हटले होते. सुपर टॅक्स कमी करण्यासाठी विषय प्रशासकीय स्तरावर मंजूर केला आहे मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. तोही विषय प्रशासनाकडून मागविण्यात आला आहे.

सोलापुरातील 50 पैकी 14 स्मशानभूमीचे सुशोभीकरण स्मार्ट सिटी निधीतून करण्यात आले आहे. त्या कामांची ऑन द स्पॉट पाहणी करण्यात येणार आहे.

सोलापूर शहरातील धूळ मुक्तीसाठी आपले प्रयत्न आहेत. त्यासाठी स्वीपर मशीन वापरण्यात येत आहे. मुख्य रस्त्यावरील धुळीचे प्रमाण निश्चितच कमी होत आहे. श्री सिद्धेश्वर तलावातील मासे ऑक्सिजन अभावी मृत पावले ही बाब लक्षात घेऊन डीपीडीसी फंडातून दीड कोटी रुपये मिळवून यातून फाउंटन मशीन खरेदी करण्यात येणार आहे. एकूण आठ मशीन लागणार असून यापैकी दोन मशीन सिद्धेश्वर देवस्थान खरेदी करणार आहे. उजनी धरणात अपायकारक गोष्टी मिसळले जात असल्याचा मुद्दा निदर्शनास आला आहे. या अपायकारक गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून शासनाला कळविण्यात येणार आहे तसेच फिल्टरायजेशनची सोयदेखील करण्याचा प्रयत्न आहे, असे महापौर म्हणाले.

सोलापूर शहरातील परिवहन सेवा सुधारण्यासाठी 100 ई बसेस लवकरच उपलब्ध होणार आहेत. ज्या मार्गावर बसेस सेवा उत्तमरीत्या सुरू राहू शकेल, अशा ठिकाणी सेवा दिली जाईल. शहरातील रस्ता दुभाजकांमधील झाडे जगवण्यासाठी सामाजिक संस्थांना काम देण्याचा प्रयत्न आहे, असेही महापौरांनी सांगितले.

प्रारंभी स्वागत आणि सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी तर प्रास्ताविक सागर सुरवसे यांनी केले. आभार उपाध्यक्ष आफताब शेख यांनी मानले. यावेळी विविध वृत्तपत्र व चॅनलचे पत्रकार, कॅमेरामन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठ्यासाठी प्रयत्न

सोलापुरात सध्या तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. ते किमान दोन दिवसाआड करावे,या दृष्टीने आपले प्रयत्न आहेत. यासंदर्भात स्पॉट व्हिजिट करून तसेच निवृत्त अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन यातून मार्ग काढण्याबाबत आपला प्राधान्यक्रम असेल. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी अनुभवी निवृत्त अधिकाऱ्यांना सेवेत संधी देण्यात येणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

### बी 2, गुंठेवारीचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर उत्पन्न वाढणार

सोलापूर शहरातील बी 2 चा प्रश्न मार्गी लागण्यासाठी महापालिकेने ठराव करून शासनाकडे पाठवला आहे. याच पद्धतीने गुंठेवारी नियमित करून नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. गुंठेवारीचा प्रश्न सुटल्यास महानगरपालिकेचे उत्पन्नही वाढणार आहे, असेही महापौर कोंड्याल म्हणाले.

### सुधारित आकृतीबंध, लाडकमिटी प्रतीक्षा यादी संदर्भात प्रशासनाला सूचना

सोलापूर महापालिकेचा सुधारित आकृतीबंध आणि लाड कमिटी अंतर्गत प्रतिक्षा यादीतील नियुक्ती आदेश या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत त्याचबरोबर मंत्रालय स्तरावरही शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे महापौर यांनी सांगितले.

# नियमबाह्य सायलेन्सर मोडिफाय करून बसवू नयेत- सहा.पोलीस अधिक्षक डगळे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपुरात बुलेट दुचाकीधारकांकडून कंपनीने नियमानुसार दिलेले सायलेन्सर काढून त्याऐवजी मोठ्या कर्कश आवाजाचे नियमबाह्य सायलेन्सर बसविण्याचे प्रकार वाढले असून, त्यामुळे ध्वनी प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शहर व परिसरातील नागरिकांनी आपल्या दुचाकी, विशेषतः बुलेट वाहनांवर कंपनीने नियमाप्रमाणे दिलेले सायलेन्सरच वापरावेत. मोठ्या कर्कश आवाजाचे, नियमबाह्य सायलेन्सर मोडिफाय करून बसवू नयेत, असे आवाहन सहा. पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.



बुलेट सायलन्सरमधील फेरफारामुळे ध्वनीप्रदूषणात वाढ होत असून नागरिकांना विशेषतः रात्रीच्या वेळी त्रास सहन करावा लागतो. या कर्कश आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.नागरिकांनी वाहनांमध्ये अनधिकृत बदल न करता वाहतूक नियमांचे पालन करावे. शहरात बुलेट दुचाकीच्या सायलन्सर मध्ये बदल करुन मोठा आवाज करणाऱ्यांवर वाहतूक शाखेकडून विशेष मोहिम राबविण्यात येत असून. नागरिकांनी दुचाकी वाहनांवर कंपनीने नियमाप्रमाणे दिलेले सायलेन्सरच वापरावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात ध्वनी प्रदुषण नियम व पर्यावरण संरक्षण अधिनियम या अतंर्गत संबधितावर कारवाई करण्यात येईल असे आवाहनही आवाहन सहा. पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.

# डॉल्बीच्या युगामध्ये लावणी जिवंत - स्वरूपाराणी मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आपल्या लावणीचे महत्व या मातीतच नाही तर विदेशातही पोहचले आहे.ही कला आताच्या युगात व डॉल्बीच्या युगामध्ये जिवंत ठेवणे सोपी गोष्ट राहिली नाही असे स्पर्धा समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीच्या वतीने, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, यांच्या १०८ व्या जयंती निमित्त, आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पधेर्ला दिमाखात प्रारंभ झाला. स्पधेर्चे उद्घाटन सौ. सुलक्षणादेवी मोहिते पाटील यांचे हस्ते दिपप्रज्वलनाने झाले.

या वेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, जयंती समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, सुमित्रादेवी खानविलकर, स्पर्धा समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, सहकार महर्षी लावणी कलावंत पुरस्कर्ते रेश्मा परितेकर, प्रमिला लोदगेकर, पांडुरंग घोटकर, थिएटर मालक सुरेखा पवार, कल्याणी घावरे, अनिता डवरी, डॉ. अशोकराव जाधव, किसनराव जाधव, सुरेश हरगुडे, भरत पालवे, संदीप चंदन, रूपा परभणीकर यांचे सह कलाकार,रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**या स्पर्धेसाठीची भव्य पारितोषिके -**

प्रथम क्रमांकास रुपये तीन लाख, द्वितीय क्रमांकास रुपये दोन लाख, तृतीय क्रमांकास रुपये एक लाख अशी बक्षिसे आहेत. तर उत्कृष्ट नृत्यांगना रुपये ५ हजार व कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील स्मृती चषक, उत्कृष्ट अदा (वैयक्तिक) रुपये ५ हजार, उत्कृष्ट मुजरा रुपये ३ हजार, या शिवाय उत्कृष्ट ढोलकीपटू, उत्कृष्ट पार्श्वगायिका, उत्कृष्ट पेटीवादक व उत्कृष्ट तबलावादक यांनाही वैयक्तिक पारितोषिक देण्यात येणार आहेत.

स्मृतिभवन शंकरनगर येथे दि.२८ फेब्रुवारी व १ मार्च या कालावधीत या स्पर्धाचे आयोजन केले आहे. पुढे बोलताना कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या, जयसिंह मोहिते पाटील यांनी सहकार महर्षींचे अमृत महोत्सवी जयंती वर्ष १९९३ पासून, राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पधेर्ला सुरुवात केली.व हा लावणी स्पधेर्चा प्रवास अविरतपणे तब्बल २६ वर्ष चालला.पुन्हा २०२४ पासून हा प्रवास पुढे सुरु आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जुनी पारंपारिक कला जतन करण्याचा हा प्रयत्न आहे. यामध्ये पारंपारिक कलाकारांचे व रसिकांचे मोठे योगदान आहे.या वर्षी ११ पाट्यांना सहभाग दिला आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी सादरीकरणाचा पहिला मान अलंकार सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी सुपा, अहिल्यानगर या संघाला मिळाला. त्यांनी सादर केलेल्या सर्वच लावण्याला रसिकांनी दाद दिली.

सायंकाळी उशिरापर्यंत गीता अश्विनी श्रुती वाईकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र गोकुळ शिरगाव कोल्हापूर, अपर्णा कीर्ती नगरकर लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र सणसवाडी पुणे, वैशाली समसापुरकर जय अंबिका सांस्कृतीक कला केंद्र सणसवाडी पुणे, बेला श्रद्धा नेटूरकर जय भवानी सांस्कृतिक कला केंद्र, पांढरीचा पूल, अहिल्यानगर या पाट्यांचे दमदार सादरीकरण झाले. सूत्रसंचालन राजकुमार पाटील व किरण सूर्यवंशी यांनी केले.

# अनगर विद्यालयात गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला सोलापूर शाखेच्या वतीने पर्यवेक्षक राजेंद्र डोके, विलास गुंड, महादेव पवार, बजीरंग पाचपुंड, माधवी पाचपुंड व अल्मास बागवान यांना उपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.याबद्दल मुख्याध्यापक महादेव चोपडे यांच्या शुभहस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. तर मोहोळ या ठिकाणी सेवा सहयोग संस्थेकडून भरवण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात यशस्वी झालेल्या जान्हवी भडकवाड,संकेत खताळ, ज्ञानेश्वरी खताळ, सोहम पासले, श्रीराज पासले यांचा तर प्रश्नमंजुषेत श्रवण यादव, उत्कर्ष माळी, अर्जुन काळे, यशराज गुंड व स्वरा भडकवाड यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यालयास मोहोळ तालुका चॅम्पियनशिपचे सन्मानचिन्ह मुख्याध्यापकाकडे प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेमध्ये स्वरा भडकवाड, समर्थ काळे, समीक्षा लवळे, प्रज्ञा शिंदे, प्रतीक पवार व उत्कर्ष माळी यांनी यश मिळवल्याबद्दल ज्येष्ठ विज्ञान शिक्षक परमेश्वर थिटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक महादेव चोपडे, उपमुख्याध्यापक माधव खरात' पर्यवेक्षक राजेंद्र डोके, सोमनाथ गुंड, हनुमंत गुंड,सुनिल सरक, किरण भडकवाड, अनुराधा गोडसे, अनिता लांडगे, रंजना सरक, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक व यशस्वी विद्यार्थ्यांचे राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील, लोकनेते साखर कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, संस्थाध्यक्षा प्रियांका पाटील नगराध्यक्षा प्राजक्ता पाटील,मुख्यकार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, मुख्याध्यापक रामचंद्र पाटील, मुख्याध्यापक संजय डोंगरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# इराणवरील हल्ल्यांच्या निषेधार्थ 4 मार्च रोजी माकप कडून आक्रमक जनआंदोलन - कॉ. आडम मास्तर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** इराणवर सुरू असलेल्या आक्रमक लष्करी कारवायांच्या निषेधार्थ भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) (माकप) तर्फे दिनांक 4 मार्च रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे तीव्र व आक्रमक जनआंदोलन व निदर्शने आयोजित करण्यात आली आहेत.

पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, इराणवर अमेरिका व इस्रायलने केलेले हल्ले हे त्या देशाच्या सार्वभौमत्वावर उघड आक्रमण असून आंतरराष्ट्रीय कायद्याचे घोर उल्लंघन आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे मध्यपूर्वेत तणाव प्रचंड वाढला असून जागतिक शांततेसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे.

माकपचा ठाम विश्वास आहे की युद्ध हा कोणत्याही प्रश्नाचा उपाय नाही. संवाद, कूटनीती आणि शांततापूर्ण चर्चेच्या माध्यमातूनच मतभेद सोडविले जावेत. लष्करी हस्तक्षेपामुळे निरपराध नागरिकांचे बळी जात आहेत, तेलाच्या किमती वाढून सर्वसामान्य जनतेवर महागाईचा अतिरिक्त भार पडत आहे आणि जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.



कॉ. आडम मास्तर यांनी केंद्र सरकारला आवाहन केले की भारताने आपल्या स्वतंत्र व निर्भीड परराष्ट्र धोरणाची परंपरा जपत या हल्ल्यांचा स्पष्ट शब्दांत निषेध करावा व तात्काळ युद्धविरामासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढाकार घ्यावा. भारत हा शांतता, सहअस्तित्व आणि निर्गुट परंपरेचा पुरस्कर्ता देश असून त्याने ठाम युद्धविरोधी भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

शेवटी माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व शांतताप्रेमी नागरिक, कामगार, शेतकरी, युवक, महिला व लोकशाहीवादी संघटनांना 4 मार्च रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आक्रमक जनआंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे जाहीर आवाहन केले आहे.

माकप हा शांतता, लोकशाही आणि जनतेच्या हक्कांसाठी लढणारा पक्ष असून आंतरराष्ट्रीय पातळीवर साम्राज्यवाद व आक्रमणवादाच्या विरोधात आपला संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# विभागीय हातमाग कापड स्पर्धेचे 10 मार्च रोजी आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील हातमाग व्यवसायातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी हातमाग विणकर सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांसाठी आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांचे दिशानिदेर्शानुसार विभागीय स्तरावर प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर त्यांच्यावतीने मंगळवार, दि. 10 मार्च 2026 रोजी सकाळी 09.00 वाजता सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघ, अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

या कापड स्पर्धेकरीता हातमाग विणकरांनी हातमागावर विणलेल्या पारंपारीक व अपारंपारीक डिझाईनच्या अतिउत्कृष्ट नाविण्यपुर्ण व कलात्मक वाणाची प्रदर्शीत वाणामधून निवड करुन उत्कृष्ट वाणास प्रोत्साहनपर बक्षिस देवून हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर यांचे अधिपत्याखालील जिल्ह्यासाठी म्हणजे सोलापूर जिल्ह्यासह सांगली, कोल्हापूर, सातारा व पुणे या जिल्ह्यातील प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्था / स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरासाठी हातमाग कापड स्पर्धा आहे.

विभागीय हातमाग कापड स्पर्धा करीता पारंपारीक (साड्या, लुगडी, लुंगी, खणावळी, धोतरे, घोंगड्या इत्यादी) व अपारंपारीक (टॉवेल, चादरी, शर्टींग, कोटींग पडद्याचे कापड, मफलर, शॉल, वॉल हेंगींग इत्यादी) वाणाचे हातमाग विणकरांनी त्यांनी हातमागावर उत्पादन केलेले कलात्मक व नाविण्यपुर्ण वाण दिनांक 9 मार्च 2026 पर्यंत प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर, सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी पत संस्था इमारत, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील. या वाणाबाबतचा संपुर्ण तांत्रिक उत्पादनाचा तपशिल व विणकराचा तपशिल न चुकता सादर करणे आवश्यक राहील. दिनांक 9 मार्च 2026 रोजी सायंकाळी 5:30 वाजेपर्यंत वाणाचे नमुने स्विकारण्यात येत असून, तद्नंतर प्राप्त होणारे वाण स्विकारले जाणार नाहीत, असे प्रसध्दिी पत्रकात नमूद आहे.

या कार्यालयास हातमाग विणकर सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी विणकराकडून प्राप्त झालेल्या वाणाचे दिनांक. 10/03/2026 रोजी आयोजित केलेल्या स्पर्धेत प्रदर्शीत करण्यात येवून त्यामधून विभागीय हातमाग कापड निवड समिती मार्फत उत्कृष्ट वाणाची निवड करण्यात येणार आहे. या स्पर्धा कार्यक्रमास हातमाग व्यवसायाशी संबंधीत हातमाग विणकरांना उपस्थित राहता येईल. तसेच स्पधेर्साठी उत्पादनाचे वाण सादर केलेल्या विणकरांना या कार्यक्रमास न चुकता हजर राहणे आवश्यक आहे. विभागीय हातमाग कापड स्पर्धेत सहभाग घेवून प्रदर्शीत केलेल्या वाणामधून प्रथम पारितोषीक रु. 25,000/-, द्वितीय 20,000/- व तृतिय बक्षिस 15,000/- प्रमाणे पारितोषीक जाहिर करुन हातमाग विणकरांना समारंभाच्या वेळी प्रशस्तिपत्रकासह देण्यात येणार आहे.

विभागीय हातमाग स्पर्धेकरीता हातमाग सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन उज्वला पळसकर, प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर यांनी केले आहे.

# प्रभाग क्रमांक 26 मधील कृष्णा कॉलनी येथे रस्ते कामास सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक 26 मधील कृष्णा कॉलनी येथे लक्ष्मी कंट्रक्शन कडून ड्रेनेजची कामे करण्यात आली होती परंतु माजी नगरसेविका सौ. राजश्री चव्हाण यांच्या निधीतून सदर नगरामध्ये रस्ते करण्यात आलेले होते. ड्रेनेज लाईन केल्यामुळे सदरचे रस्ते उखडले गेले होते ते रस्ते आहे त्या स्थितीत बनवून द्यावे ते असे संबंधित लक्ष्मी कंट्रक्शनला सोलापूर महानगरपालिका आयुक्त व शासनाचे आदेश आहेत. परंतु सदर कामास दिरंगाई होत होती सदर नगरातील नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही दखल घेत नव्हते शेवटी सदर नगरातील नागरिकांनी ही बाब माजी नगरसेविका सौ.राजश्री चव्हाण यांच्या निर्दशनास आणून दिल्यानंतर यशस्वी पाठपुरावा केल्यामुळे

केवळ चारच दिवसात सदर ठिकाणी रस्ते कामाला सुरुवात करण्यात आली आहे.सदरचा रस्ता झाल्यामुळे लक्ष्मी कंट्रक्शन कडून सैफुल ते बॉम्बे पार्क पर्यंत जाणाऱ्या रोडवर ड्रेनेजचे काम चालू असल्याने रस्ता बंद करण्यात आला आहे त्यामुळे सदरचा पयार्यी रस्ता झाल्यामुळे जुळे सोलापुरातील सर्वसामान्य नागरिकांना डी मार्ट,IMS कॉलेज, आसरा चौकाकडे जाण्यासाठी सोयीचे झाले आहे त्यामुळे सर्व थरातून माजी नगरसेविका सौ.राजश्री चव्हाण यांचे कामाचे कौतुक होत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय येथे लोकशाही दिनात 40 तक्रारी अर्ज प्राप्त

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन घेण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आजच्या लोकशाही दिनात एकूण 40 तक्रारी प्राप्त झाले आहेत. या तक्रारी संबंधित कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असून त्या कार्यालयानी तात्काळ या तक्रारींचा निपटारा करावा, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिले.

**लोकशाही दिनात संबंधित शासकीय कार्यालयाकडे आलेल्या तक्रारी पुढील प्रमाणे...**

पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण - 3, महसूल विभाग - 17, जिल्हा परिषद सोलापूर - 5, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - 2, सार्वजनिक बांधकाम विभाग - 1, सहाय्यक आयुक्त, नगरपालिका प्रशासन - 1, महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळ एमआयडीसी - 1, महावितरण - 1, म्हाडा - 1, लिड बँक - 2, अन्न औषध प्रशासन - 1, इतर - 5 असे एकूण 40 तक्रारी अर्ज प्राप्त झाले.

उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून त्यांचे तक्रार निवारणासाठी योग्य ती कारवाई केली. त्यावेळी लोकशाही दिनात उपस्थित सोलापूर विद्यापीठातील लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभागातील प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी देखील लोकशाही दिन कार्यक्रमामध्ये काय कामकाज चालते हे पाहण्यासाठी उपस्थित होते. त्यावेळी त्यांना निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी मार्गदर्शन केले की, लोकशाही दिन हा जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येत असतो. जिल्हास्तरावर शासकीय कार्यालयामध्ये आपली कामे होत नसतील तर त्याचा तक्रारी अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय येथे सादर करावयाचा असतो व त्याचे तक्रारींचे निवारण लोकशाही दिनामध्ये केले जाते. येथे अर्ज केल्यानंतर योग्य ती कारवाई होते व आपले काम खात्रीशीररित्या पूर्ण होते असा नागरिकांना विश्वास आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सांगितले.